# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक 25.06.2012 (का.प.क्र.-04) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

बुधवार दिनांक 25.06.2012 रोजी मा.सभापती श्री.विकास रतनलाल जैन यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी 11.30 वाजता वंदेमातरम् या गिताने सुरू झाली सभेला मा.प्र.आयुक्त, श्री.अजय चारठाणकर, प्र.नगर सचिव तथा उपआयुक्त (प्र) श्री.रविंद्र निकम यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

01. स. श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
02. स. श्री. हाळनोर गिरजाराम नानाराव
03. स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत
04. स. श्री.आगा खान मिया खान
05. स. श्री.मुंडे बाहासाहेब दिनकर
06. स. श्रीमती राजपुत प्राजक्ता विश्वनाथ
07. स. श्रीमती घडमोडे सविता भगवान
08. स. श्री.कुचे नारायण तिलोकचंद
09. स. श्री.बाळुलाल वरदाजी गुजर
10. स. श्री. खान अक्रम करीम खान
11. स. श्री.जाधव विजेंद्र मुरलीधर
12. स. श्रीमती निलाबाई देविदास जगताप
13. स. श्री.समीर सुभाष राजुरकर

**चर्चा :**

**श्री नारायण कुचे** : सिडको नाट्यगृह लग्नसंमारंभासाठी भाड्याने दिले आहे. खुलासा करण्यात यावा.

**श्री समीर राजुरकर** :- विभाग प्रमुख यांना माहिती नसतांना सिडको नाट्यगृह भाड्याने दिले आहे.

**श्री बाळासाहेब मुंडे** :- सिडको नाट्यगृह लग्न संमारंभाकरीता भाड्याने देता येते का?

**उपअभियंता (श्री.निकम)** :- सिडको नाट्यगृहाच्या नियमावलीप्रमाणे लग्नसंमारंभासाठी सिडको नाट्यगृह भाड्याने देता येत नाही. एन-5 येथील कम्युनीटी सेंटर येथे संबंधीत कर्मचारी यांचेकडुन एकाच दिवशी एकाच वेळेच्या दोन बुकींग चुकीने झाले असल्या कारणाने दोन्ही बांजुपैकी एकाची दुस-या ठिकाणी व्यवस्था करणे गरजेचे होते त्यामुळे संबंधीत कर्मचारी श्री.शहाणे यांनी सिडको नाट्यगृहाच्या मागील बाजुचे सभागृह पर्यायी व्यवस्था म्हणुन भाड्याने दिले आहे.

**श्री नारायण कुचे** :- संबंधीत कर्मचारी यांचेवर कार्यवाही करण्यात यावी.

**श्री रेणुकादास वैद्य** :- नियमाप्रमाणे सिडको नाट्यगृह लग्नासाठी देऊ शकत नाही.तरीही प्रशासनाने खाजगी व्यक्तीस भाड्याने दिले आहे.

श्री नारायण कुचे :- सिडको नाट्यगृह भाड्याने कुणाला दिले / कुणाच्या नावाने दिले माहिती देण्यात यावी.

डेप्युटी इंजिनिअर :- एकाच नाट्यगृहाचे दोन रजिस्टर असल्याने दोन वेगवेगळया नोंदी झाल्या.

श्री समीर राजुरकर :- नाट्यगृहाचे ऑडिट केलेले नाही. नाटयगृहाचे साउंड सिस्टीमवर वर्षाकाठी किती रक्कम दिली जाते. सिडको नाट्यगृह महानगरपालिकाकडे आल्यानंतर किती बुकींग झाली. याची माहिती देण्यात यावी. तोट्यामध्ये असेल तर आऊटसोर्सींग करण्यात येईल. नफा प्राप्त होत नसल्यास नाट्यगृहामध्ये आऊटफोर्सींग केले पाहिजे.

मा.सभापती :- सिडको नाट्यगृह लग्नसंमारंभासाठी दिले त्या कर्मचा-यांचे नांव काय आहे.

डेप्युटी इंजिनिअर :- मालमत्ता विभागात बदलीवर नव्यानेच नियुक्त झालेले कर्मचारी श्री.शहाणे यांनी बुकींग केलेली आहे.

मा.सभापती :- यानंतर सदर चुक होऊ नये. संबंधीत विभागाने याची दखल घ्यावी. शहरातील सर्व नाट्यगृहाचे ऑडीट करण्यात यावे. नाट्यगृहाचा देखभाल दुरुस्तीचा खर्च महानगरपालिकेला झेपतो किंवा नाही हे तपासुन सभागृहासमोर प्रशासनाने अहवाल सादर करावा.नियमावली शिथील करता आली तर प्रशासनाने नियम शिथील करुन देण्यात यावे. नाट्यगृहाचा खर्च परवडणारा नसेल तर आऊटसोर्सींग बाबत प्रशासनाने विचार करावा. रितसर याबाबत मान्यता घेण्यात येईल.

श्री.समीर राजुरकर :- नाट्यगृह भाड्याने देतांना डिपॉझीट रक्कम घेण्यात येते. पाच कार्यक्रमांची एक लाख रुपये एकाच वेळी वर्षाचे डिपॉझीट घेण्यात यावे व वर्षभरातुन झालेल्या कार्यक्रमांमधुन रक्कम वजा करुन घ्यावी. जेणेकरुन वर्षभराची बुकींग होऊन सदर रक्कम महानगरपालिकेची फंडात जमा होईल.

मा.सभापती :- नियमित कार्यक्रम आयोजित होत असेल तर संबंधीतांकडुन वार्षिक डिपॉझीट संबंधीतांकडुन घेण्यात यावे.

श्री.रेणुकादास वैद्य :- ट्राफिक गार्डन बाबत पत्र देण्यात आलेले नाही.

मा.सभापती :- माहिती देण्यात यावी.

शहर अभियंता :- प्रत्यक्ष स्थळभेट देऊन पहाणी केलेली आहे.लेखी देण्यात येईल.

श्री गिरजाराम हाळनोर :- 1 जुलै पासुन दोन प्रकारचा कचरा वेगळा ठेवायचा आहे. त्यासाठी ओला कचरा आणि सुका उचलण्यासाठी नागरीकांना महानगरपालिका कुंड्या उपलब्ध करुन देणार आहे का? वेगवेगळ्या कचरा गोळा करण्यासाठीचा यंत्रसामग्री महानगरपालिकेकडे आहे का? खुलासा करण्यात यावा.

श्री आगा खान :- सन-2010-11 मध्ये स्थायी समितीमध्ये वार्डातील विकास कामासाठी 13 लाख रुपये मंजुर केले आहे. आज त्यास 26 महिने झाले. प्रत्येक वेळेस सांगण्यात येते की, सुमारे 2 वर्षापासुन पाण्याची समस्या आहे. गेल्या 8 दिवसांपासुन पाण्याची समस्या अधिक प्रमाणात आहे. सदरील टेंडर का करण्यात आले नाही. माझ्या वार्डासाठी 78 लाखाचे काम अर्थसंकल्पामध्ये ठेवण्यात आलेले.(विद्युत,पाणीपुरवठा,ड्रेनेज) असुन त्यास मंजुरी मिळालेली आहे. माझ्या वार्डात कुठलेच काम झालेले नाही.

**कार्यकारी अभियंता(पापु)** :- पाणीपुरवठा सुरळीत केलेला आहे.

**मा.सभापती** :- स.सदस्यांच्या वार्डात मंजुर झालेले विकासकाम गेल्या दोन वर्षापासुन झालेले नाही. हे बरोबर नाही. खुलासा करण्यात यावा.

**कार्यकारी अभियंता(पापु)** :- एक वर्षासाठी माझ्याकडे स.सदस्य आले होते त्यावेळेस कामासंदर्भात सुचना केल्या होत्या.सदरील बाबींचा रिव्हयु घेण्यात येईल.

**श्री समीर राजुरकर** :- सदरील उत्तर बरोबर नाही. स.सदस्य भेटले नाही.तर काम होणार नाही का?

**श्री.रेणुकादास वैद्य** :- चुकीचे आहे. सदरील समस्या इतर वार्डात देखील आहे. 10 लाखाचे 20 लाखाचे काम वार्डात करण्यात यावे. समांतरचे काम करण्यास अजुन 2 ते 2 1/2 वर्ष बाकी आहे. पाणीपुरवठ्या संदर्भातील कामे करण्यात यावी.

**मा. सभापती** :- गेल्या दोन वर्षापासुन स.सदस्य श्री आगा खान यांच्या वार्डातील काम प्रलंबीत आहे. यावर ताबडतोब निर्णय घेण्यात यावा.

**श्रीमती सविता घडमोडे** :- सदर विषय मा.सर्वसाधारण सभेत मांडलेला आहे. वार्डातील पाणी सोडण्याच्या वेळेत अनियमितता आढळुन येते. वार्डात पाण्याची तिव्र टंचाई निर्माण झालेली आहे.

**कार्यकारी अभियंता(पा.पु.)** :- गेल्या 8 दिवसांपासुन पाणीपुरवठा सुरळीत व वेळेवर सोडण्याचा प्रयत्न आहे. नियोजन करण्याचे काम चालु आहे. जायकवाडी येथील पाण्याची पातळी कमी झालेली आहे.

**मा.सभापती** :- पाणीपुरवठा सुरळीत व वेळेवर येईल याकडे प्रशासनाने संबंधीत अधिकारी यांना सुचना देण्यात यावे. तसेच स.स.श्री हळनोर यांनी जो प्रश्न उपस्थित केला त्यावर चर्चा करुन प्रश्न सोडविला जाईल.

**श्री नारायण कुचे** :- सदरील एजन्सीला ब्लॅकलिस्ट करायला पाहिजे.

**मा.सभापती** :- गुत्तेदारांनी कामे घेतल्यास ती कामे केलीच पाहिजे. ताबडतोब कामे सुरु करण्यात यावी. मागील सभेत जो मुद्दा मांडला त्यावर प्रशासनाने कुठलीच कार्यवाही केलेली नाही.

**श्री समीर राजुरकर** :- आस्थापना-2 विभागास लाड समिती आणि अनुकंपांची माहिती विचारण्यात आली होती. प्रशासनाने अनुकंपा बाबतची माहिती देण्यात आलेली नाही. माहिती अपुर्ण देण्यात आलेली आहे.

**आस्थापना अधिकारी-2** :- लाड समिती अंतर्गतची माहिती देण्यात आलेली आहे.

**मा.सभापती** :- अनुकंपा तत्वावरील माहिती मागविलेली आहे.

**आस्थापना अधिकारी-2** :- आजच्या आज माहिती पाठविण्यात येईल.

**मा.सभापती** :- अनुकंपा तत्वावरील माहिती देण्यात यावी. पुढील बैठकीत काय कार्यवाही केली याची माहिती देण्यात यावी.

**श्री समीर राजुरकर** :- विद्युत विभागात 40 विद्युत लाईनमन असुन त्यातील 8 लाईनमनचा पगार विद्युत विभागातुन केला जातो का? सदर 8 जण कोठे कार्यरत आहे हे माहित नाही. सुपरवाईजर कुठे कार्यरत आहे या बाबतची माहिती नाही. तसेच इतर लाईनमन काय काम करतात याबाबत प्रशासनालाही माहिती नाही.

**मा.सभापती** :- महानगरपालिकेत किती लाईनमन आहे आणि कोठे कार्यरत आहे माहिती देण्यात यावी.

**विद्युत अभियंता** :- महानगरपालिकेत 32 लाईनमन कार्यरत आहे व 8 लाईनमन यांना सुपरवाईझर केलेले आहे असे एकुण 40 कर्मचारी कार्यरत आहे.

**मा.सभापती** :- एका लाईनमनला किती वार्ड दिले. लाईनमनला प्रत्येक वार्डातील लाईट चालु / बंद असल्याबाबत नगरसेवकांकडे जाऊन स्वाक्षरी आणावयास सांगीतले होते. काय झाले? शहरातील संपुर्ण लाईट जोपर्यंत पुर्ण सुरु होत नाही. तोपर्यंत पेमेंट अदा करण्यात येऊ नये. 32 लाईनमन आहे. एका लाईनमनला प्रत्येकी 3 वार्ड देण्याची आवश्यकता नाही काय?

**श्री समीर राजुरकर** :- सुपरवाईझर काय कामे करतात?

**उपअभियंता (विद्युत)** :- लाईनमनची प्लॅनींग तयार केलेली आहे. सर्व स.सदस्यांना यादी देण्यात येईल.

**मा.सभापती** :- 32 लाईनमनला वार्डवाईज वाटप करण्यात यावी. प्रत्येक लाईनमनला 3 याप्रमाणे वार्ड देण्यात यावे.

**श्री समीर राजुरकर** :- लाईनमनचे संपर्क क्रमांक/ मोबाईल क्रमांक देण्यात यावे. तसेच जे जाहिर निवेदन देण्यात आलेले आहे. त्यातील संपर्क क्रमांक बंद अवस्थेत आहे. सदरील संपर्क क्रमांक कुणाचे देण्यात आले आहे.

**कार्यकारी अभियंता(विद्युत)** :- मान्सुनपुर्व विद्युत पोलमुळे कुठली दुर्घटना होऊ नये म्हणुन जाहिर निवेदन दिलेले आहे. काही नागरीक जनावरे विद्युत पोलला बांधत आहे. काही दिवसांपुर्वी विद्युत पोलमध्ये विद्युतप्रवाह उतरल्यामुळे जनवारांचा मृत्यु झाला आहे. खबरदारी म्हणुन नागरीकांना वर्तमानपत्रातुन जाहिर निवेदन देण्यात आले आहे.

**श्री समीर राजुरकर** :- जाहिर निवेदन देतांना प्रशासनाने मोबाईल क्रमांकदिला आहे तो चालु असल्याची खात्री करुन वर्तमानपत्रात जाहिर निवेदन देण्यात यावे.

**कार्यकारी अभियंता(विद्युत)** :- हेल्पलाईनचा नंबर बंद झालेला आहे.

**श्री समीर राजुरकर** :- हेल्पलाईन नंबर बंद आहे, ही नागरीकांची दिशाभुल आहे.

**मा.सभापती** :- शहरातील संपुर्ण लाईट सुरु होण्यास किती दिवस लागतील.

**उपअभियंता (विद्युत)** :- 15 दिवस लागतील.शहरातील 80% लाईट सुरु आहे.

**मा.सभापती** :- संबंधीतांचे बिल दिले आहे का?

**उपअभियंता (विद्युत)** :- बिल देण्यात आले नाही. शहरातील सर्व लाईट येत्या 8 ते 10 दिवसांत संपुर्ण लाईट सुरु करण्यात येईल.

**श्री गिरजाराम हळनोर**
**श्री मोहन मेघावाले** : दहा दहा दिवस माझ्या वार्डातील लाईट बंद अवस्थेत असतात.

**मा.सभापती** :- लाईनमनने वार्डातील लाईट सुरु असल्याबाबत नगरसेवकाची स्वाक्षरी आणावी. तसेच शहरातील सर्व लाईट 8 दिवसात सुरू करण्यात यावे.

**श्री रेणुकादास वैद्य** :- मंत्रालयाला आग लागली.रिव्हयु घेतला पाहिजे. आपणांकडे अग्निशमन यंत्रणा आहे. त्याचाही रिव्हयु घेतला पाहिजे.शहरात 7 ते 8 मजली इमारत आहे. अग्निशमन विभाग अशा ठिकाणी आग लागल्यास ती विझवण्यास सक्षम आहे काय? खुलासा करण्यात यावा.

**मा.सभापती** :- खुलासा करण्यात यावा.

**उपमुख्य अग्निशमन अधिकारी** :- अग्निशमन बाबत विभागाने Team तयार केलेली आहे. दोन दिवसांत अहवाल सादर करणार आहे. तसेच महानगरपालिका प्रशासकीय इमारत फायर संबंधी तपासणी करुन झालेली आहे.फायर एक्झ्युक्युशन लावलेले नाही.

**मा.सभापती** :- 7 व्या मजल्यावर आग लागल्यास ती विझविण्यास यंत्रणा सक्षम आहे का?

**उपमुख्य अ.अ.** :- 7व्या मजल्यापर्यंत आग लागल्यास मनपाची यंत्रणा आग विझविण्यात सक्षम नाही? 7व्या मजल्यापर्यंत जाण्यासाठी व इतर यंत्रसामुग्री मनपाकडे नाही.तसेच मनपाच्या इमारतीमधील अग्निशमन यंत्रणा कार्यन्वित नाही.

**श्री.बाळासाहेब मुंढे** :- अधिकारी/ कर्मचारी यांना अग्निशमन बाबत ट्रेनिंग दिली पाहिजे.

**मा.सभापती** :- किती मजल्यापर्यंत आग विझवु शकतो.

**उप.मु.अग्निशमन अ.** :- 8व्या मजल्यापर्यंत आग विझविण्याची क्षमता/यंत्रणा महानगरपालिकेकडे आहे.

**श्री.समीर राजुरकर** :- याबाबतची संपुर्ण माहिती स्थायी समितीला देण्यात यावी. मनपाच्या इमारतीमध्ये अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित नाही. याबाबतचा अहवाल देण्यात यावा.

**मा.आयुक्त** :- Rescular किती मिटरपर्यंत जाऊ शकते.

**उप.मु.अग्निशमन अ.** :- 100 फुट पर्यंत पाणी देऊ शकतो.

**मा.सभापती** :- पुढील बैठकीत अहवाल देण्यात यावा.

**कार्यकारी अभियंता** :- मनपाच्या इमारती तसेच मुख्यालय येथे इलेक्ट्रीसीटी बोर्ड, वायरिंग तपासणी व दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आलेले आहे.

**श्री.बाळासाहेब मुंढे** :- गुंठेवारी भागातील नागरीक पैसे भरण्यास तयार आहे. गुंठेवारी कक्षामध्ये माहिती विचारण्यास गेले असता अधिकारी जागेवर भेटत नाही. गुंठेवारी भागातील नागरीक गुंठेवारीचे पैशाची भरणा करुनही सुविधा मिळत नाही. शहरात 117 गुंठेवारी वसाहती आहे. संबंधीत अधिकारी यांना दुरध्वनीद्वारे संपर्क साधला असता ते भेटत नाही. दोन वर्षापासुन सदरील भागास सुविधा मिळत नाही.

**मा.सभापती** :- गुंठेवारी विभाग सक्षम करण्याची गरज आहे.

**श्री.रेणुकादास वैद्य** :- 5 ते 7 वर्षापासुन गुंठेवारी भाग नियमित करण्याचे आश्वासीत केले जाते. नागरीकांचा चांगला प्रतिसाद आहे. परंतु गुंठेवारी कक्ष येथे नागरीक भेटण्यास येतात तेव्हा अधिकारी त्यांचे जागेवर भेटत नाही.गुंठेवारी कक्ष प्रमुख यांचा फोन बंद असतो. गुंठेवारी भागात अधिकारी सक्षमपणे काम करत नाही. या विभागाचा चार्ज सक्षम अधिकारी यांचेकडे देण्यात यावा. त्याशिवाय शहराचा विकास होणार नाही.

**मा.सभापती** :- गुंठेवारी अंतर्गत घरे नियमित करण्याकडे नागरीकांची मानसिकता तयार झालेली आहे. गुंठेवारी नियमित झाल्याशिवाय शहराचा विकास होणार नाही.

**श्री.नारायण कुचे** :- गुंठेवारी कायद्या अंतर्गत गुंठेवारी नियमित करण्याकरीता पैशाची मागणी केली जाते. याबाबत चौकशी करण्यात यावी.

**मा.सभापती** :- गुंठेवारी भाग हा शहराचाच एक भाग आहे. गुंठेवारी विभाग सक्षम करण्याची आवश्यकता आहे. गुंठेवारी विकास सक्षम करण्यात यावा. अधिकारी नेमण्यात यावा. गुंठेवारी विभागास H.O.D.नेमण्यात यावा H.O.D.नसल्यामुळे हा प्रश्न उद्‌भवतो.

**श्री.समीर राजुरकर** :- मालमत्ता कर जानेवारी,फेब्रुवारी,मार्च या महिन्यात वसुली केली जाते. मालमत्ता वसुलीचे काही प्रकरणे 10 ते 15 वर्षापासुन प्रलंबित आहे. सदर

विषयात सक्षमपणे लक्ष घालावे. सदरील नागरीकांशी चर्च करुन वसुली केली पाहिजे.

मा.सभापती :- सदरील विषयावर वेगळी स्थायी समिती सभा लावण्यात येईल.मनपाकडे मॅन पॉवर होत आहे.त्याचा परिणाम वसुलीवर होत आहे. स्थायी समितीच्या यावर वेगळी स्वतंत्र बैठक आयोजित करण्यात येईल.

श्री.आगाखान :- मागील बैठकीस लक्ष्मणचावडी ते एम.जी.एम. येथील अतिक्रमण काढणे बाबत रुलींग देण्यात आली होती. सर्व्हे झाल्यानंतरही त्या ठिकाणी अतिक्रमण होत आहे. नोटीस देण्यात आलेल्या आहे काय? खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती :- खुलासा करण्यात यावा.

प्रशासकीय अधिकारी :- एम.जी.एम. ते लक्ष्मणचावडी येथील अतिक्रमणावरील पंचनामा करण्यात आलेला आहे.

मा.सभापती :- रस्ता रुंदीकरणावर अतिक्रमण करण्याची शक्यता जास्त आहे. अतिक्रमण विभागाने कार्यवाही न केल्यास अतिक्रमण वाढण्याची शक्यता आहे. एम.जी.एम. ते लक्ष्मणचावडी येथील अतिक्रमण ताबडतोब काढण्यात यावे.

श्री.नारायण कुचे :- इमारत निरीक्षक कार्यवाही न करता हप्ता घेतला जातो.

मा.सभापती :- सभागृहाने जो निर्णय दिला त्यावर अंमलबजावणी झालीच पाहिजे.

श्री.नारायण कुचे :- माजी खासदार यांचे घरी जाऊन B.I. पैसे मागतात.

मा.सभापती :- प्रशासनाने कार्यवाही करण्यात यावी.

श्री.बाळासाहेब मुंढे :- वॉर्डातील अतिक्रमण काढण्यास B.I. गेल्यास B.I. नागरीकांना नगरसेवकांने सांगीतले असे आमचे नांव सांगतात.

श्री.मोहन मेघावाले :- सलीम अली सरोवर येथील एस.टी.पी.प्लॅन्ट अणि सौंदर्यकरण याबाबत माहिती देण्यात आलेली नाही.

मा.सभापती :- सविस्तर माहिती देण्यात यावी.

श्रीमती प्राजक्ता राजपुत :- महिला व बालकल्याण अधिकारी नियुक्त झाले आहे काय? पिको फॉल मशिन बाबत खुलासा करण्यात यावा?

उपआयुक्त(प्र) :- मागील बैठकीत सविस्तर खुलासा केलेला आहे. LBT बाबत निर्णय घेण्यासाठी संचिका मा.आयुक्त महोदय यांचेकडे पाठविण्यात आलेली असुन 30 तारखेला R.C.ची मुदत संपत आहे. महिला बालकल्याण अधिकारी म्हणुन श्रीमती आंधळे यांना चार्ज देण्यात आलेला आहे. अतिरीक्त चार्ज असल्यामुळे त्या नियमित कार्यालयात येत नाही.

मा.सभापती :- स.सदस्या श्रीमती घडमोडे यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे की, मेन रोडला ड्रेनेज लाईन टाकण्याच्या तसेच शहरातील इतर भागातील D.S.R. मध्ये एवढा फरक का?

शहर अभियंता :- दोन्ही D.S.R. मध्ये फरक आहे हे बरोबर आहे. मेनरोडचे जे काम चालु आहे त्या ठिकाणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण चा D.S.R. वापरला जातो.इतर कामासाठी PWD चा DSR वापरला जातो.महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचा रेट 80% मार्केटपेक्षा कमी आहे. सदर रेट गेल्या 5 वर्षापासुन बदलेले नाही. एमआयडीसी मध्ये औरंगाबाद शहरात वापरले जाते. 50 ते 60% Above ने वापरले जाते.

श्री.रेणुकादास वैद्य :- वेगवेगळे दर वापरले जाते.

**शहर अभियंता :- यापुढे दोन्ही ठिकाणी सारखे दर असेल.**

**विषय क्र. 06 : (विषय क्र. 03 पुढील सभेत ठेवण्याबाबत दि. 15/06/2012 रोजीच्या सभेतील निर्णयाप्रमाणे)**

**दिनांक 21/02/2011 (का.प.क्र.12), 14/03/2011 (का.प.क्र.13), 21/03/2011 (का.प.क्र.14), 22/03/2011 (का.प.क्र.15), 13/04/2011 व 15/04/2011 (दि.13/04/2011 ची तहकुब सभा) (का.प.क्र.16) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभांचे इतिवृत्त कायम करणे.**

**टिप : (इतिवृत्तांताच्या प्रती यापूर्वीच सर्व संबंधीतांना वितरीत करण्यांत आलेल्या आहेत.)**

**मा.सभापती :- विषय क्रमांक 6 स्थगित.**

**ठराव :**

**प्रस्तुत प्रस्ताव स्थगित ठेवण्यांत यावा, असे सर्वानुमते ठरले.**

**विषय क्र. 07 :**

**शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, प्र.क्र.61 समर्थनगर अंतर्गत वरद गणेश मंदिर भागातील रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामाचे अंदाजपत्रक म.जी.प्रा./सा.बां. खात्याच्या सन 2011-2012 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून रक्कम रू.29,84,000/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. सदर कामाचे निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण 2 निविदा विक्री होऊन स्वीकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत 2 निविदा दर भरून प्राप्त झाल्या असल्याचा अहवाल ई-निविदा विभागाकडुन प्राप्त आहे. त्याचा तुलनात्मक तपशिल खालीलप्रमाणे आहे.**

**1. मे.ए.एस.कंन्स्ट्रक्शन - अंदाजपत्रकीय दरापेक्षा 1.66 % कमी दराने**

**2. मे.आदिनाथ कंन्स्ट्रक्शन - अंदाजपत्रकीय दरापेक्षा 1.15 % कमी दराने**

**उपरोक्त प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा मे.ए.एस.कंन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा म्हणजेच 1.66% कमी दराची आहे. सदर प्राप्त दराच्या निविदेस मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता देवून मा.स्थायी समिती सभेची मंजुरी घेणे बाबत शिफारस केली आहे.**

**तरी मे.ए.एस.कंन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 1.66% कमी दराच्या निविदा मान्यतेचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ सादर.**

**मा.सभापती : विषय क्रमांक 7 मंजुर.**

**ठराव :**

**प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्र.क्र.61 समर्थनगर अंतर्गत वरद गणेश मंदिर भागातील रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी दराचे निविदाधारक मे.ए.एस.कंन्स्ट्रक्शन यांचेमार्फत सदरील काम अं.प. दरापेक्षा 1.66% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.**

**याच बरोबर मा.सभापती यांनी राष्ट्रगीताने सभा संपल्याचे घोषित केले.**

**नगर सचिव,**
**महानगरपालिका औरंगाबाद.**